# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट २६८ - २३** **दिनांक : - २१/०८/२०२३**

## अनाधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरीकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक १७.०८.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष -भाईंदर यांना त्यांच्या खास बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रुम नं.अे/१०४, राजमहल बिल्डींग, पुजानगर, नयानगर, मिरारोड पुर्व व रुम नं.००५, के मरियम अपार्टमेन्ट, नयानगर, मिरारोड पुर्व या ठिकाणी बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत असुन काही बांगलादेशी नागरीक एच.डि.एफ.सी. बॅक, नयानगर मिरारोड पुर्व या ठिकाणी कामासाठी एकत्र येतात.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह वरील नमुद ठिकाणी साफळा रचुन ०५ स्त्री-पुरुष बांगलादेशी नागरीकांना ताब्यात घेवून त्यांचेकडे प्राथमिक विचारपूस केली असता, ते पारपत्र व व्हीसाशिवाय अनाधिकृतपणे वास्तव्य करीत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने त्यांचे विरुध्द पोशि/१२११६ चेतनसिंग मानसिंग राजपुत, नेम. अ.मा.वा.प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा क्र. ४४९/२०२३, भारतीय पासपोर्ट अधिनियम १९६७ चे कलम ३, ६, १२ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७, १४प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे पोनि समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, रामचंद्र पाटील, विजय निलंगे, पो.हवा. किशोर पाटील, सम्राट गावडे, पो.अं. केशव शिंदे, चेतनसिंग राजपुत म.पो.अं. अश्विनी भिलारे, शितल जाधव, महिला मसुब अश्विनी वाघमारे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.